महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन आदेश क्रमांक : कअनि १११७/प्र.क्र.९२/१४-ब

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई ४०००३२.

दिनांक : १३ डिसेंबर, २०१७

<u>संदर्भ</u>- समक्रमांकाचे दिनांक ०७.०८.२०१७ रोजीचे आदेश

<u>शासन आदेश</u>

मंत्रालयीन विभागातील कक्ष अधिकारी संवर्गातील प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांपैकी प्रतिनियुक्तीचा कालावधी संपुष्टात आलेल्या कक्ष अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीच्या सेवा संदर्भाधीन आदेशान्वये प्रत्यावर्तित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिका, विरार, जि.पालघर येथे प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेले श्री.स.र.सुर्वे, कक्ष अधिकारी यांच्या प्रतिनियुक्तीच्या सेवा प्रत्यावर्तित करून त्यांची पदस्थापना उद्योग, ऊर्जा व कामगार विभागामध्ये करण्यात आली आहे. श्री. स.र.सुर्वे, कक्ष अधिकारी हे अद्याप उद्योग, उर्जा व कामगार विभागात रूजू झालेले नाहीत.

२. श्री. स.र.सुर्वे, कक्ष अधिकारी हे उद्योग, उर्जा व कामगार विभागात अद्यापपर्यंत रूजू न झाल्याने त्यांना या आदेशान्वये वसई विरार शहर महानगरपालिका, विरार, जि.पालघर या कार्यालयातील प्रतिनियुक्तीच्या पदावरून दिनांक १३ डिसेंबर, २०१७ (म.पू.) पासून एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे.

३. श्री. स.र.सुर्वे, कक्ष अधिकारी यांनी म.ना.से. (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ चे नियम १५ अनुसार अनुज्ञेय पदग्रहण अवधी उपभोगून इतर कोणत्याही आदेशाची प्रतिक्षा न करता उद्योग, उर्जा व कामगार विभागामध्ये रूजू व्हावे. श्री.सुर्वे, कक्ष अधिकारी हे विहित कालावधीत उद्योग, उर्जा व कामगार विभागामध्ये रूजू न झाल्यास त्यांचा त्यापुढील कालावधी हा सेवेतील खंड समजण्यात येईल.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२१३१२२१२९४३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration, postalCode=400032, st=Andhra Pradesh, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2017.12.13 13:45:55 +05'30'

(ग.भि.गुरव)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. श्री.स.र.सुर्वे, सहायक आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका, विरार, जि.पालघर.

प्रत:-

१) अपर मुख्य सचिव(सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२) अ.मु.स./प्र.स./सचिव, उद्योग, उर्जा व कामगार/ग्रामविकास/नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई ३२.
३) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका, विरार, जि.पालघर.
४) सह/उप सचिव (आस्थापना), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग /ग्राम विकास/ नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई ३२
५) निवडनस्ती (का.१४ ब).